# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## परीक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग

कॉम्प्लेक्स परिसर,एम.आय.डी.सी. रोड, गडचिरोली–४४२६०५

दूरध्वनी क्रमांक:कार्यालय: ०७१३२–२२३३२०
ईमेल : *coegondwana@gmail.com*

जा. क्र. गों.वि./परिक्षा वि./ ९२ /२०१८

दिनांक : २१/०५/२०१८

## परिपत्रक

### For On Screen Revaluation

**(अभियांत्रिकी विधी, औषधीशास्त्र, शिक्षणशास्त्र, विद्याशाखा आणि एम.एस.सी.एम.कॉम,एम.बी.ए. एम.सी.ए. अभ्यासक्रम)**

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्लित सर्व महाविद्यालयातील प्राचार्य व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, उन्हाळी २०१८ मध्ये परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकेची मुल्यांकन (अभियांत्रिकी, विधी, औषधीशास्त्र, शिक्षणशास्त्र, विद्याशाखा आणि एम.एस.सी.एम. कॉम,एम.बी.ए.एम.सी.ए. अभ्यासक्रम) On Screen पध्दतीने झालेले आहे. त्या विद्यार्थ्यांनी Hardcopy/(Photocopy) आणि Challenge of Valuation (Revaluation) यासाठी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली चे निर्देश क्रमांक १७८/२०१५ व दि.०९/१२/२०१६ चे सुधारित निर्देश क्र.२२२/२०१६ नुसार खालील पध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

१ Procedure For Hardcopy (Photocopy) Application

विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकेची पुनर्मुल्यांकनाकरीता Hardcopy साठी अर्ज करावा लागेल. सदर विद्यार्थ्यांनी त्यांच्या महाविद्यालयामध्ये जावून निकाल घोषित झाल्याच्या ५ दिवसाच्या आत Online पध्दतीने अर्ज करावा, त्याकरीता प्रति पेपर १५०/- रूपये शुल्क आकारण्यात येईल. संबंधित महाविद्यालयांनी त्यांच्या महाविद्यालयामध्ये भरलेले अर्ज विद्यापीठामध्ये २ दिवसाच्या आत जमा करावे.

या सदराखाली त्याच्या उत्तरपत्रिकेची Hardcopy (Photocopy) देण्याची कार्यवाही घेण्यात येईल. **(फक्त दोन विषयाकरीता)** याकरीता संबंधित महाविद्यालयाच्या Log In वर Hardcopy (Photocopy) देण्यात येईल व महाविद्यालयांनी संबंधित विद्यार्थ्याला ३ दिवसात उपलब्ध करुन दयावी. ही जबाबदारी सर्वस्वी महाविद्यालयाची राहील.

२. Procedure For Challenge To Valuation (Revaluation)

विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्तरपत्रिकेचे Hardcopy (Photocopy) प्राप्त झाल्यानंतर Challenge To Valuation (Revaluation) करावयाचे असल्यास ताबडतोब २ दिवसाच्या आत संबंधित महाविद्यालयामध्ये जावुन Online पध्दतीने अर्ज करावा. पुनर्मुल्यांकनांसाठी प्रति पेपर १५०/– शुल्क आकारण्यात येईल. विद्यार्थ्यांने संबंधित महाविद्यालयामध्ये Online अर्ज भरल्यानंतर महाविद्यालयाने त्यांना प्राप्त अर्ज २ दिवसाच्या आत विद्यापीठामध्ये जमा करणे आवश्यक राहील. **(फक्त दोन विषयाकरीता)** ज्या विद्यार्थ्यांने Hardcopy साठी अर्ज केला असेल अशाच विद्यार्थ्यांना Challenge To Valuation (Revaluation) करीता अर्ज करता येईल.

महाविद्यालयाने धनाकर्ष हा कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅकेचा **''वित्त व लेखा अधिकारी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली''** यांचे नावे काढावा.

**नोटः–** अभियांत्रिकी विधी, औषधीशास्त्र, शिक्षणशास्त्र, विद्याशाखा आणि एम.एस.सी. एम.कॉम,एम.बी.ए.एम.सी.ए. अभ्यासक्रम) या पैकी ज्या विषयाचे निकाल घोषित होतील त्या दिनांकापासुन ग्राहय धरण्यात येईल. याची सर्व महाविद्यालय व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. Hardcopy (Photocopy) आणि Challenge To Valuation (Revaluation) ची प्रक्रिया www.gondwana.university. या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(डॉ.जे.व्ही.दडवे)
संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.